KALYAN DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

APPENDIX 'D-1'

FORM FOR SANCTION OF BUILDING PERMISSION AND COMMENCEMENT CERTIFICATE

To,
Sunit Co. Op. Hsg. Society.
P.O.A. - M/s. Pramukh Developers through Partner
Patel RPL Realty Pvt. Ltd. through Director Mr. Ankit Patel.
Architect – Mr. John Varhgese, Kalyan.
Structural Engineer – Mr. S. V. Patel, Dombivali.

With reference to your application dated 15/01/2024 for the grant of sanction of Commencement Certificate under Section 44 of The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section 253 of Maharashtra Municipal Corporations Act, 1949 to carry out development work / Building on CTS No. 185 & 186, Village – New Dombivali, situated at Dombivali (East) the Commencement Certificate / Building Permit is granted under Section 45 of the said Act, subject to the following conditions:

1. The land vacated in consequence of the enforcement of the set-back rule shall form part of the public street in future.
2. No new building or part thereof shall be occupied or allowed to be occupied or used or permitted to be used by any person until occupancy certificate is granted.
3. The Commencement Certificate/ Building permit shall remain valid for a period of one year commencing from the date of its issue unless the work is not commenced within the valid period.
4. This permission does not entitle you to develop the land which does not vest in you.

Office No. KDMC/TPD/BP/DOM/2024-25/01
Office Stamp
Date : 01/04/2024

Yours faithfully,

For Assistant Director of Town Planning
Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

नगररचना विभाग

बांधकाम प्रारंभ परवानगी क्र:. KDMC/TPD/BP/DOM/2024-25/01

DT - 01/04/2024

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार मौजे नवि डोंबिवली येथील न.भू.क्र. १८५, १८६ मध्ये मालमत्ता पत्रकानुसार ५२३.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर **UDCPR** नुसार **Basic FSI, Chapter 7.6.1** नुसार १५.०० चौ.मी. प्रति सदनिका याप्रमाणे १० सदनिकांचे १५०.०० चौ.मी. **Tenament FSI** व त्याअनुषंगाने अनुज्ञेय होणारा **Ancellary FSI** विचारात घेऊन ११०१.७९ चौ.मी. बांधकाम क्षेत्रासह भुखंडाचा विकास करावयास दिनांक १५/०१/२०२४ रोजीच्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम प्रारंभ परवानगी देण्यात येत आहे.

बांधकामाचा तपशील :–

- इमारत – स्टिल्ट + पहिला मजला ते चौथा मजला (रहिवास)

अटी व शर्ती :–

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र. २.८.३ नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करणेपुर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहिल.

२) UDCPR मधील विनियम क्र. 1.5 Savings मध्ये नमूद a to h बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांवर बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क्र. १२.१ ते १२.३ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी वास्तुशिल्पकार, Structural Enineer व परवानगीधारक यांचेवर राहिल, याची नोंद घ्यावी.

७) भूखंडाकडे जाण्या–येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे येणा–जाण्याचे मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.

८) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग, (क.डों.म.पा) च्या परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करु नये.

९) बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकावयाचे झाल्यास महापालिकेच्या बांधकाम खात्याची परवानगी घेणे आवश्यक राहील व त्याकरीता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम (दंड झाल्यास त्यासह रक्कम) भरावी लागेल तसेच निरूपयोगी साहित्य महापालिका सांगेल त्या ठीकाणी स्वखर्चाने वाहून टाकणे आपणावर बंधनकारक राहील.

१०) वापर परवाना दाखला घेण्यापुर्वी कर विभाग, जलनि:सारण विभाग व मलनि:सारण विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग, उद्यान विभाग, क.डों.म.पा. यांचेकडील ना–हरकत दाखला बांधकाम नकाशासह सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

११) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेणेपूर्वी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निर्देशाप्रमाणे इमारतीत सौरउर्जा उपकरणे बसवून विद्युत विभागाकडील ना हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

१२) **UDCPR** मधील विनियम क्र. १३.३ नुसार भुखंडावरील इमारतीत रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत अंमलबजावणी करणे आपणांवर बंधनकारक राहील.

१३) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेणेपूर्वी मा. जिल्हाधिकारी, यांचेकडील सनद सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

१४) **UDCPR** मधील विनियम क्र. १३.४ नुसार ग्रे–वॉटर रिसायकलींग बाबत कार्यवाही करणे तसेच संबंधित विभागाचा ना हरकत दाखला सादर करणे आपणांवर बंधनकारक राहील.

१५) **UDCPR** मधील विनियम क्र. १३.५ नुसार घनकचरा व्यवस्थापना बाबत कार्यवाही करणे तसेच संबंधित विभागाचा ना हरकत दाखला सादर करणे आपणांवर बंधनकारक राहील.

१६) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

१७) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि वरीलप्रमाणे घालून दिलेल्या अटींप्रमाणे करणे आपणावर बंधनकारक राहील.

१८) सदर प्रकरणी चुकीची व अपुर्ण माहिती दिली असल्यास सदर बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

१९) प्रकरणी भूखंडाच्या मालकी हक्काबाबत काही वाद असल्यास अथवा निर्माण झाल्यास त्यांचे संपूर्ण निराकरण करण्याची जबाबदारी आपली राहील. याबाबत आपण हमीपत्र सादर केले आहे.

२०) प्रकरणी इमारतीचे बांधकाम करतेवेळी महिला कामगारांकरीता तात्पुरत्या स्वरुपात स्वतंत्र खोली व टॉयलेटीची व्यवस्था करणे आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपण हमीपत्र सादर केले आहे.

२१) प्रकरणी भूखंडाच्या पोहच रस्त्याबाबत भविष्यात कोणताही वाद / न्यायालयीन दावा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी आपली राहील.

२२) प्रत्यक्ष जागेवर निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रण मिळविणेकामी बांधकाम व विकास कामांच्या सभोवताली किमान व योग्य उंचीपर्यंत पत्र्याचे कंपाऊंड वॉल उभारणे आपणावर बंधनकारक राहील.

२३) प्रकरणी इमारत विकसित करताना वातावरणातील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमितपणे बांधकाम साहित्यावर (उद. रेती, खडी इ.) नियमितपणे पाण्याचा शिडकावा करणारी यंत्रणा कार्यान्वित करणे आपणावर बंधनकारक राहील.

२४) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, राज्य शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या निर्देशानुसार बांधकामासाठी लागणारा सर्व साहित्याचा साठा आच्छादीत करुन ठेवणे आपणावर बंधनकारक राहील.

२५) प्रकरणी विषयांकित भूखंडामधील अस्तित्वातील सोसायटी धारकांची भविष्यात कोणतीही तक्रार आल्यास त्याचे निराकरण करणेची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

टिप:— UDCPR नुसार वरीलपैकी आपणास लागु असलेल्या अटींची पूर्तता करणे आपणावर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

इशारा:—मंजूर बांधकाम प्रस्तावाव्यतिरिक्त केलेल्या अनधिकृत फेरबदलांबाबत आपण महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम—५१ ते ५७ च्या तरतूदी नुसार दखलपात्र गुन्हयास पात्र राहाल.

<u>बांधकाम परवानगीअंतर्गत भरण्यात आलेल्या रक्कमेचा तपशिल:—</u>

अ.क्र.	लेखाशिर्ष	रक्कम	पावती क्र.	दिनांक	यापुर्वीचा एकुण भरणा तपशिल	शेरा
१	ARI 020101	5,17,755/-	AC49222	28/03/2024		
२	ARI 020103	5,510/-	AC49222	28/03/2024		
३	ARI 020104	7,98,000/-	AC49222	28/03/2024		
४	ARI 020105					
५	ARI 020110					
६	ASI 010304	23,142/-	AC49219	28/03/2024		
७	ASI 010513	2,93,353/-	AC49222	28/03/2024		
८	ASI 010518	5,17,755/-	AC49220/-	28/03/2024		
९	ASI 010519					
	TOTAL	21,55,515/-				

सहाय्यक संचालक नगररचना, करीता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

प्रत :—
१) करनिर्धारक व संकलक क.डो.म.पा.कल्याण.
२) प्रभाग क्षेत्र अधिकारी 'ह' प्रभाग क्षेत्र.
३) उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थाप विभाग, क.डो.म.पा. कल्याण
४) उप आयुक्त, मालमत्ता विभाग, क.डो.म.पा. कल्याण